# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.


माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या
ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

<u>अपिल क्र.१४ /२०११</u>
सुनावणी दिनांक १४/१२/२०११

श्री जि.वी.राजपुत,
मु.कोबापुर, पो.कनकोर,
ता.गंगापुर, जिल्हा: औरंगाबाद ... अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, सिनेप्लॅनेटसमोर,
सायन सर्कलजवळ, रोड नं.८, सायन,
मुंबई-४०० ०२२ ... प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार दिनांक १९/९/२०११ रोजी, माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ (मुख्यालय) यांच्याकडे अर्ज केलेला होता. सदरहू अर्जातील मुद्दयांबाबत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१. **मुद्दा क्र.१** मध्ये सन २००४ ते अर्जाच्या तारखेपर्यंत ज्या अधिकारी/कर्मचा-यांना एम.एस.सी.(पर्यावरण) या अभ्यासक्रमासाठी मंडळातर्फे परवानगी देण्यात आलेली आहे,

अशा कर्मचा-यांची नावे व दिलेल्या परवानगीच्या प्रती देण्यात याव्यात, ही मागणी करण्यात आलेली होती.

त्यासंबंधात वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ५/१०/२०११ च्या पत्राद्वारे सदरहू अर्जातील विविध मुद्यांबाबत माहिती दिलेली आढळते. तसेच, अपिल करणार यांनी सदरहू पत्राची प्रत योग्य तो छायांकित प्रतींचा खर्च भरुन, जन माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्याकडून दिनांक २४/१०/२०११ रोजी प्रत्यक्ष घेतलेली असल्याचे मान्य केले. त्या उत्तरामध्ये ५ अधिकारी / कर्मचारी यांना एम.एस.सी (पर्यावरण) या अभ्यासक्रमाकरिता मंडळाने परवानगी दिली असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आढळते.

२. **मुद्दा क्र.२** मध्ये अपिल करणार यांनी ज्या अधिका-यांच्या सेवापुस्तकामध्ये एम.एस.सी (पर्यावरण) अभ्यासक्रम पूर्ण केल्याची नोंद घेतलेली आहे, अशा अधिका-यांच्या सेवापुस्तकांची प्रमाणित केलेली प्रत देण्यात यावी, ही मागणी केलेली होती.

त्याबाबत आस्थापना शाखेतर्फे दिनांक ५/१०/२०११ च्या पत्राद्वारे अशी माहिती देण्यात आली की, केवळ श्री चेतन सावंत, कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हेच मुख्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याकडून अभ्यासक्रम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सेवापुस्तकात नोंद घेण्यात येईल. मात्र, इतर अधिकारी /कर्मचारी यांची सेवापुस्तके ज्या ठिकाणी ते कार्यरत आहेत, अशा कार्यालयांमधून अर्जदाराने घेण्यात यावीत, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

अपिल करणार यांनी उत्तराबाबत जोरदार आक्षेप घेऊन, असे स्पष्ट केले की, माहिती अधिकर अधिनियम, २००५ मधील कलम-६(३) (दोन) नुसार ज्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत येतो, त्यांना मूळ अर्ज किंवा संबंधीत भाग याबाबत माहिती देणेबाबत अर्ज मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत हस्तांतरीत करणे गरजेचे होते. मात्र, संबंधीत मानीव माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी ही माहिती अद्यापपावेतो हस्तांतरीत केली किंवा नाही याबाबत अपिल करणार यांस काहीही माहिती कळविण्यात आलेली नाही. त्यामुळे, अपिल करणार यांची स्पष्ट विनंती आहे की, अपिलीय प्राधिकरणाने संबंधीत आस्थापना शाखेच्या अधिका-यांना योग्य ती समज देण्यात यावी.

वरील मुद्दयांबाबत चर्चा करता असे स्पष्ट दिसून येते की, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, ठाणे यांना दिनांक २२/११/२०११ रोजीच्या पत्राद्वारे संबंधीत माहिती ही वैयक्तिक असल्यामुळे, संबंधीत कर्मचा-यांना विचारुन, ही माहिती देता येईल किंवा कसे? याबाबत निर्णय घेण्यात यावा व तसे अर्जदारास कळवावे, असे कळविलेले होते. परंतु, सदरहू पत्राची प्रत अपिल करणार यांना सुनावणीच्या तारखेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही आणि अपिल करणार यांना वरील बाबत कोणतीही माहिती अवगत करुन देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट होते.

अशा परिस्थितीमध्ये, अपिलीय प्राधिकरणाचे असे स्पष्ट मत आहे की, अपिल करणार यांना जर वरील माहिती वेळेमध्ये कळविली असती आणि वरील पत्रव्यवहार

संबंधीत माहिती अधिकाराच्या नियमाप्रमाणे विहित वेळेमध्ये केला असता, तर अपिल करणार यांना हे अपिल करण्याचे कारण राहीले नसते. तरी, यापुढे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी अशा प्रकारे कोणत्याही प्रकारे विलंब न करता, माहिती अधिकार कायद्याअन्वये केलेल्या अर्जावर त्वरीत कार्यवाही करणे गरजेचे आहे, याची नोंद घ्यावी. वरील माहिती आस्थापना शाखेने १५ दिवसांच्या आत प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, ठाणे व मंडळाची इतर संबंधीत कार्यालये यांच्याकडून घेऊन अपिल करणार यांना उपलब्ध करुन द्यावीत.

आस्थापना शाखेतर्फे कलम ११ (१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार संबंधीत त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती पुरावयाची असेल तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी, अशी विनंती करण्यात आल्यापासून ५ दिवसांच्या आत सदरहू माहिती प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ व्यक्तिस देऊन, अशी माहिती द्यावी किंवा कसे? याबाबत निवेदन घेऊन जर कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत अशी माहिती असेल ती सोडून, इतर माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल, असे स्पष्ट करण्यात आलेले असल्याचे निदर्शनास आणून दिले.

मात्र, अपिल करणार यानी त्रयस्थ पक्ष याची व्याख्या कलम २(ढ) मध्ये दिलेली असून, त्यामध्ये माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरीकाव्यतिरिक्त अन्य एखादी

व्यक्ति असा अर्थ दिलेला असल्याचे आणि सार्वजनिक प्राधिकरणाचा त्यामध्ये सामावेश होतो, हे निदर्शनास आणून दिले.

अशा परिस्थितीमध्ये आस्थापना शाखा / संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये संबंधीत व्यक्तिचे म्हणणे ऐकून जर मागितलेली माहिती व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत नसेल तर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे, हे त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी यापेक्षा अधिक महत्वाची असेल तर ती माहिती प्रकट करण्याची परवानगी द्यावी व त्याप्रमाणे सदरहू माहिती प्रकट करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

३. **मुद्दा क्र.३ व ४** मध्ये सन २००९ मध्ये निवड केलेल्या ११६ क्षेत्र अधिका-यांना शासनाच्या ज्या परिपत्रकानुसार परिविक्षा कालावधी मध्ये परावर्तीत रजा, अर्जित रजा, किरकोळ रजा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, अशा परिपत्रकाची प्रत, तसेच वरील ११६ क्षेत्र अधिका-यांचे सेवा पुस्तक त्यांना नियमित न केल्यामुळे, शासनाच्या कोणत्या परिपत्रकानुसार सेवापुस्तकात नोंद करण्यात आली, सदरहू परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिल करणार यांनी मान्य केले.

४. **मुद्दा क्र.५ व ६** मध्ये श्री विशाल राजपूत व संजय कवरे यांच्या कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक व क्षेत्र अधिकारी पदावरील सेवापुस्तकाची सर्व पानांची प्रमाणित प्रत आणि नवीन नियुक्त करण्यात आलेल्या क्षेत्र अधिकारी पदाची सेवा पुस्तकाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली होती.

मात्र, वर उल्लेख केल्याप्रमाणे संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांच्याकडे सदरहू माहितीबाबत मागणी करण्यात आलेली असून, त्याबाबत व्यावसायिक किंवा वाणिज्यिक माहिती नसल्यास, १५ दिवसांच्या आत योग्य तो निर्णय घेऊन, अपिल करणार यांस माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे स्पष्ट करण्यात येत आहे. तसेच, संबंधीत मप्रनि मंडळाच्या अधिका-यांना दिलेल्या दिनांक २२/११/२०११ रोजी पत्राची प्रत अपिल करणार यांना पुढील माहितीसाठी योग्य तो पाठपुरावा करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे. अपिल करणार हे जर वरील माहिती मिळाली नाही तर, पुढील अपिल संबंधीत प्राधिकरणाकडे दाखल करु शकतील, असे स्पष्ट करण्यात येत आहे.

दिनांक १४ डिसेंबर, २०११ दिवशी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
प्रथम अपिलीय अधिकारी